पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ३

**सभावृत्तांत**

दिनांक - **०९/०५/२०१७** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक **०९/०५/२०१७** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.सागर बाळासाहेब गवळी - सभापती**
२. मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे - उपसभापती
३. मा.कदम शशिकांत गणपत
४. मा.डोळस विकास हरिश्चंद्र
५. मा.संतोष बबन कांबळे
६. मा.गीता सुशिल मंचरकर
७. मा.वाघमारे अश्विनी विक्रम

या शिवाय मा.रत्नपारखी – कार्यकारी अभियंता,, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तुपसाखरे – उप अभियंता, मा.मुथा – प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.२) झोपडपट्टी पुनर्वसना बाबत – मा.गीता मंचरकर, मा.अश्विनी वाघमारे यांचा प्रस्ताव.

----------

अ) दिनांक २५/०४/२०१७ रोजी झालेल्या विशेष सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक २)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) दिनांक १९/०१/२०१७, ०२/०२/२०१७ व २५/०४/२०१७ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ४)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

इ) दिनांक ०२/०२/२०१७ व २५/०४/२०१७ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ५)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------

ठराव क्रमांक - ०५ विषय क्रमांक - ०१
दिनांक - ०९/०५/२०१७ विभाग – नगररचना व विकास
सुचक : मा.अश्विनी वाघमारे अनुमोदक : मा.गीता मंचरकर
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१३/५४/२०१५, दि.११/०५/२०१५
विषय – पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण मंजूर विकास योजनेतील मौजे भोसरी येथील दक्षिणोत्तर १२.० मी. रुंद रस्त्यापासून ते एम.आय.डी.सी. हद्दीपर्यंत स.नं.१५ पै. व

स.नं.१४ पै. मधील २४ व १२ मी.रुंद (पुर्व-पश्चिम) रस्त्याचे भूसंपादनाबाबत...

विषय क्रमांक ०१ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

**सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला.**

ठराव क्रमांक - ०६ विषय क्रमांक - ०२

दिनांक - ०९/०५/२०१७ विभाग – नगररचना व विकास

सुचक : मा.गीता मंचरकर अनुमोदक : मा.अश्विनी वाघमारे

संदर्भ : मा.गीता मंचरकर, मा.अश्विनी वाघमारे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.९ गांधीनगर डॉ.आंबेडकर (नेहरुनगर) ही घोषित झोपडपट्टी असून राजीव गांधी वसाहत, नेहरुनगर ही अघोषित झोपडपट्टी आहे. सदरील झोपडपट्टयांचे आजपर्यंत कोणतेही पुनर्वसन करण्यात आलेले नसल्याने सदर झोपडपट्टयांचे पुनर्वसन करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सागर बाळासाहेब गवळी )**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७९५/२०१७
दिनांक : १२/०५/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 2017 sub committee sabhapati.doc